# नव्वदोत्तर मराठी कथेतील नवजाणिवा

# New Trends in post-90s Marathi fiction

**प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर**

सहायक प्राध्यापक

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर

इ मेल veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी 9403014885

## गोषवारा :

साहित्य ही केवळ एका लेखकाची निर्मिती असली तरी व्यापक अर्थाने ती लेखक ज्या काळात जगत असतो, त्या काळाची आणि त्याच्या समकाळात जगत असलेल्या समाजमनाची अभिव्यक्ती असते. 1990 पासूनचा कालखंड साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. देश स्वतंत्र होऊन तेव्हा चार दशके झालेली होती. भारताने जागतिकीकरणात प्रवेश केलेला होता. कारगील युद्धातील अभूतपूर्व विजय, दळणवळणाच्या साधनांत आमूलाग्र क्रांती, औद्योगिकरण, शिक्षणाची विस्तारलेली क्षितिजे, तांत्रिकतेचा जीवनावरील प्रभाव यांमुळे लोकांच्या मानसिकतेत व्यापकपणा आलेला होता; पण त्याचबरोबर बेरोजगारी आणि वाढते स्त्रीअत्याचार यांमुळे समाज भयभीत झाला होता. मूल्यांच्या पडझडीतून स्वतःला वाचवत मार्गक्रमण करणाऱ्या देश, समाज, कुटुंब यांचे अवलोकन करून त्याचे दर्शन घडविणारी कथा या नव्वदोत्तर काळात लेखकांनी निर्माण केली.

## Abstract:

Although literature is only the creation of an author, in a broad sense it is an expression of the time in which the author lives and the social mind of his time. The period since 1990 is an important phase in terms of literature. It had been four decades since the country became independent. India had entered globalization. The unprecedented victory in the Kargil War, the radical revolution in the means of communication, industrialization, the widening horizons of education, the impact of technology on life had broadened the mindset of the people; But at the same time, the society was scared due to unemployment and increasing oppression of women. In the post-90s period, the writers created a story that shows the country, society, and family that are saving themselves from the fall of values.

## बीजशब्द :

जागतिकीकरण, नव्वदोत्तर मराठी कथा, स्त्रीवादी लेखिका, बेरोजगारी, औद्योगिकरण

## प्रस्तावना :

1990 नंतर धार्मिक आर्थिक, तात्त्विक आणि राजकीय व्यवहारावर ज्या मूल्यांचा प्रभाव दिसतो, त्याचे संबोधन आपण 'बाजार' या संज्ञेने करू शकतो आणि या मूल्य संस्कृतीला 'बाजार संस्कृती' असे संबोधू शकतो. या पार्श्वभूमीवर 'बाजार' ही संज्ञा केवळ अर्थशास्त्रीय उरत नसून ती धार्मिक, आर्थिक, व राजकीय अशी एकूण सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातील ठरते, हे लक्षात घेतले पाहिजे.

म्हणून नव्वदनंतरच्या मराठी साहित्याचा विचार करताना सामाजिक, ग्रामीण, प्रादेशिक, महानगरी किंवा राजकीय अशा वर्गीकरणाच्या मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. अनुभवाचे केंद्र ग्रामीण महानगरी कोणतेही असो त्या एकूणच जीवनाला प्रभावीत करणारी मूल्यसंस्कृती एकच आहे आणि ती बाजार मूल्यांची आहे. अनेक साहित्यप्रकार वरवर पाहता ग्रामीण प्रादेशिक दिसतात; पण त्या साहित्यातील जीवनदर्शनाची आपण चिकित्सा

केली तर ती बाजारमूल्ये केंद्रस्थानी असलेली राजकीय दर्शन असते. मराठी अभ्यासकांनी 'राजकीय' या विश्लेषणालाही मर्यादित केले आहे. देश किंवा राज्याच्या व्यवस्थेतील पक्षीय राजकारण किंवा सत्ताकारण म्हणजेच 'राजकारण' असे समजणे हा भाबडेपणा आहे. राजकारणापासून कोणतेही क्षेत्र अलिप्त नाही. भारताच्या संदर्भात नव्वदनंतर प्रथमच ग्रामीण आणि शहरी, गरीब आणि मध्यमवर्गीय असा संघर्ष उभा राहिला. ज्या वर्गाकडे साधनसंपत्ती पुरेशा प्रमाणात आहे आणि जे आधुनिक जीवनशैलीत जगतात त्यांचा 'इंडिया' हा एक देश आहे, तर दुसरीकडे जे जीवनावश्यक गरजांपासूनही वंचित आहेत आणि आधुनिक विकासाच्या मुख्य प्रवाहाबाहेर आहेत ते 'भारत' नावाच्या दुसऱ्या देशात राहतात, अशी मांडणी शेतकरी संघटनेने वारंवार केली आहे. स्वातंत्र्यानंतर देशात सामाजिक परिवर्तनाच्या अनेक चळवळी निर्माण झाल्या होत्या. आर्थिक, सामाजिक, व वर्गीय विषमतांना समूळ नष्ट करणे या व्यापक उद्दिष्टाने अनेक लोकलढे उभारले गेले. त्यातून समाजमन ढवळले गेले. पारंपरिक धार्मिक व सांप्रदायिक कट्टरता स्वतंत्र भारतातील सामाजिक सहजीवनाला मोठे आव्हान होते. शेतकऱ्यांची चळवळ ही जशी राजकीय ठरते, तशीच स्त्रीपुरुष विषमतेला आव्हान देणारी स्त्रीवादी विचारसरणी हीदेखील राजकीयच आहे.

परंतु नव्वदनंतर परिवर्तनासाठी उदयास आलेल्या या संघटना आणि चळवळी लयास गेल्या कारण 'खाउजा' धोरणाने जागतिक पातळीवर निर्माण झालेली बाजार संस्कृती सर्वत्र सारख्याच प्रभावाने कार्यरत झाली. सगळ्याच देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. ही राजकीय कृती असली तरी तिचा परिणाम मोठ्या शहरातील श्रीमंत घरातील बेडरूमपासून शेतातल्या झोपडीपर्यंत सारख्याच तीव्रतेने झाला आहे. शिक्षण, आरोग्य व सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण झाले. ग्रामीण बेरोजगारांचे लोंढे शहराकडे धावू लागले. राजकारणामध्ये जातीय व प्रांतीय अस्मितेचा वापर वाढल्याने सत्ताकेंद्रे अधिक लोकशाहीविरोधी होऊ लागली. धार्मिक असहिष्णुता वाढली. धार्मिक दंगली वाढल्या. सहकार क्षेत्र डबघाईस आले. या सर्व परिस्थितीत ग्रामीण जनता भरडून निघाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. सर्वच सांस्कृतिक पातळीवर वातावरण ढवळून निघाले. या पार्श्वभूमीवर जे साहित्य निर्माण झाले, ते एकंदर भारतीय साहित्याच्या संदर्भातच मैलाचे दगड ठरले आहेत आणि या साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा राजकीयच आहेत.

## नव्वदोत्तर कथा :

नव्वदोत्तर साहित्यात 'कथा' या वाङ्मयप्रकाचा उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते. 'कथा हा साहित्यप्रकार कवितेसारखा अल्पावसानी नाही की कादंबरीसारखा प्रदीर्घ नाही. तो सुवर्णमध्य साधणारा, रसिक मनाला भावणारा आहे. त्याला मूल्य आहे. महत्त्व आहे. परंपरासुद्धा आहे. चोखंदळ रसिकांची त्याला नेहमीच दाद मिळते.'[1] कथेच्या दृष्टीने नव्वदोत्तरी साहित्याचा विचार केला तर कथेतही जागतिकीकरणाचे पडसाद मोठ्या प्रमाणात उमटलेले आहेत. जागतिकीकरणानंतर विदर्भात जे ग्रामीण कथालेखक आहेत, त्यात 1990 च्या आधीपासूनही कथा लिहिणारे लेखक आहेत. तर काही नव्याने जागतिकीकरणानंतर लिहू लागले आहेत. ग्रामीण कथाकारांच्या दुसऱ्या पिढीत विदर्भाचे उद्धव शेळके, भाऊ मांडवकर, मनोहर तल्हार, वामन इंगळे, बाजीराव पाटील हे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आहेत. त्यातील बहुतेक लेखकांवर तत्कालीन परिस्थितीचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. उद्धव शेळके यांच्या कादंबरी व कथांमधून ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य, शोषण, अन्याय, दारिद्र्याचे प्रत्ययकारी चित्रण केलेले दिसते. सामाजिक व आर्थिक भिन्नतेतून ग्रामजीवनात निर्माण होणारे प्रश्न, संघर्ष यांचे अप्रतिम, अंतर्मुख करणारे चित्रण त्यांच्या कथांमध्ये येते. त्यांच्या काही कथांमध्ये वासनांची विविध रूपेही चित्रित होतात. या कथा साध्या, सरळ पण अंतर्मुख करणाऱ्या आहेत. भुकेची भयानकता व भयावहता अनेक कथांमधून दिसते. वैदर्भीय ग्रामीण स्त्रियांचे त्यांच्या कथांमधील चित्रण वैविध्यपूर्ण व वास्तव आहे. बदलत्या जीवनमूल्यांचे भान त्यांच्या कथेला आहे.

उद्धव शेळके यांचे समकालीन कथाकार म्हणजे मनोहर तल्हार. त्यांचा 'कॅन्सल' हा कथासंग्रह 1994 चा आहे. तल्हारांची कथा वैदर्भीय ग्रामीण परिसराचा गंध घेऊन येणारी कथा आहे. ग्रामीण जीवनाचे विविध बारकावे, रंगढंग, लकबी, वृत्ती, प्रवृत्ती यांसह ती प्रगटते. उद्धव शेळके यांच्या कथेबद्दल म.ना. अदवंत म्हणतात,

'ती व्यक्ती आणि परिस्थिती यांच्या समन्वयातून निर्माण होणारी कथा आहे.'[2] ग्रामजीवन, ग्रामव्यवहार, सुखदुःखे, व्यथा, वेदना, भाव भावना, जीवनसंघर्ष यांचे चित्रण या कथा करतात. हिंदू-मुस्लिम संबंध हे मनोहर तल्हार यांच्या कथात्मक लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'कॅन्सल' या कथासंग्रहातील 'अतुट' या कथेतूनही याच विषयाचा प्रत्यय येतो. 'वऱ्हाडी माणसांचे खास वऱ्हाडी ढंगाने नि रंगाने साकार केलेले चित्र म्हणजे तल्हारांची वऱ्हाडी कथा.'[3] ग्रामीण भागात वास्तव्य असणाऱ्या गरीब मुस्लिम कुटुंबामध्ये असणारे कलह, ताणतणाव व याही परिस्थितीत एकमेकांवर असणारे त्यांचे अतुट प्रेम याचे चित्रण हृदयस्पर्शी आहे. तल्हारांची 1990 नंतरची कथा नवे विषय हाताळणारी व आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

बाजीराव पाटील हे कथाकथन करणारे विदर्भाचे आद्य कथाकार आहेत. विनोदी स्वभावाचे असल्यामुळे त्यांनी वैदर्भीय ग्रामजीवन विनोदाच्या अंगाने मांडले आहे. 'मिरच्याच्या खळ्यावर, 'ग्रेट झेडपी सर्कस' हे त्यांचे विनोदी कथासंग्रह. त्यांनी श्रोत्यांना खळखळून हसवता हसवता अंतर्मुख केले. त्यांच्या कथांमध्ये ग्रामीण परिसर, ग्रामीण ध्वनी, ग्रामीण व्यवहार, चालीरीती यांचे वास्तव व कलापूर्ण चित्रण येते.

नव्वदोत्तर आंबेडकरी वाङ्मयात जी कथा लिहिली गेली त्यातील मोजकीच कथा अनुभवविश्व आणि एकूणच मराठी कथेच्या विस्तारण्याच्या दृष्टीने समृद्ध आहे. त्यामध्ये गौतमीपुत्र कांबळे, प्रज्ञा दया पवार, दीपध्वज कोसोदे, आत्माराम गोडबोले, प्रकाश मोगले, संजय डोंगरे, जयराज खुने यांच्या कथांचा विचार करायला हवा.

गौतमीपुत्र कांबळे यांच्या 'परिव्राजक' या 2004 साली प्रकाशित झालेल्या कथासंग्रहाद्वारे आंबेडकरी कथासृष्टीत नव्या प्रतिमांची भाषा योजून आपले वेगळेपण अधोरेखित केले. त्यामधून त्यांनी नवे सांस्कृतिक विश्व साकारले आहे. 'परिव्राजक' हे शीर्षकच बौद्ध संस्कृतीची ओळख करून देणारे ठरते. त्यातील अंतर्गत दीर्घकथांची 'परिव्राजक' , 'शिल्पासन' , 'विरूपनगरी' , 'शोध सहाव्या इंद्रियाचा' ही कथाशीर्षके प्रतिमांच्या अंगाने मूल्यगर्भ आशयासकट बौद्ध संस्कृतीच्या बोलक्या खुणा प्रकट करतात. ज्यामुळे आंबेडकरी कथाविश्वाला नवा आशय व विशय अनुभवायला मिळाला आहे. प्रतिकात्मक पात्रांच्या मुखी घातलेल्या नव्या भाषिक रचनाशैलीमुळे व जीवनानुभूतीद्वारे गौतमीपुत्र कांबळे यांनी विचारानुभव, भावानुभव व संवेदनानुभवाचा वेगळा परिचय मराठी कथाविश्वाला करून दिला आहे.

'अफवा खरी ठरावी म्हणून' हा 2010 मध्ये प्रकाशित झालेला कथासंग्रह अत्याधुनिक जीवनशैलीतील आषयविश्व घेऊन एकूणच मराठी कथासृष्टीत दाखल झाला आहे. आंबेडकरी कथा प्रांतातील मूल्यजाणिवेच्या चौकटीला धक्के देत या कथेने जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या मोह आमिषात व सुखासीन जगण्यास्तव हपापलल्या महानगरीय जीवनाचा अचूक वेध घेऊन, आंबेडकरी कथेला नवा आकार दिला आहे. एका अर्थाने झपाट्याने बदललेल्या आंबेडकरी कथेला नवा आकार दिला आहे.

स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना असे दिसते की, 1975 पासून सुरू झालेला स्त्रीवाद 1990 नंतर अधिकच टोकदार झाला. लिंगभेदाच्या पलीकडचा हा विचार सगळ्याच स्त्रियांनी स्वीकारला नाही. पुरुषसत्ताक पद्धतीत कुटुंब सांभाळून स्त्री विकसित होत राहिली. या सगळ्या जाणिवा 1990 नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये प्रामुख्याने दिसून येतात. एकेकाळी पुरुषांच्या छत्रछायेत लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखनाचा परीघ वेगळा होता. कितीही नाही म्हटले तरीही पुरुषांच्या छायेतच त्यांचे लेखन फुलले. नव्वदोत्तर कालखंडात स्त्रियांचे भावविष्व आणि अनुभव व्यापक झाले. कक्षा रुंदावल्याने कोणताही विषय त्यांना वर्ज्य राहिला नाही. आशय-विषयाचा परीघ मोठा झाला. सामाजिक, राजकीय, मानसिक, मनोविश्लेषण, शरीरनिष्ठ अनुभव स्त्रियांनी मोठ्या ताकदीने मांडले. ग्रामीण, दलित, सत्रीवादी, आदिवासी या वाङ्मय प्रवाहातील अनेक लेखिकांचे साहित्य पुढे आले होते. त्यात मुख्यतः नीरजा, सिसिलिया कार्व्हालो, सीमा भारंबे, ललिता गादगे, सुनंदा गोरे, प्रज्ञा दया पवार या सर्वच कथालेखिकांनी आपल्या कथांमधून ज्या जीवन जाणिवा मांडल्या, त्यात जागतिकीकरणामुळे मानवाच्या जगण्यात झालेल्या बदलांचे पडसाद उमटलेले आहेत. स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने नवीन शिखरे पादाक्रांत करण्यास सुरुवात केली. त्याबरोबरच त्यांच्या समस्यांचे स्वरूपही बदलले. घर आणि कार्यक्षेत्र अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतःला सिद्ध करता करता त्यांना ज्या अडचणी आल्या त्याचे चित्रण बहुतेक कथांमध्ये आढळते.

नव्वदोत्तर काळात ज्यांचे प्रकर्षाने नाव घ्यावे लागेल अशा प्रख्यात स्त्रीवादी लेखिका म्हणजे नीरजा. त्यांनी 2001 ते 2012 या कालावधीत तीन कथासंग्रह लिहिले. यातील कथांमध्ये स्त्री पुरुष केंद्रस्थानी आहेत. जे दर्पणी बिंबले' या कथासंग्रहातील कथांमधून स्त्रीचे जगणे प्रतिबिंबित होते. 'नीरजा यांच्या कथा स्त्रीलक्ष्यी आहेत. स्त्रीपुरुष नात्यातील अनेकविधतेचा, गुंतागुंतीचा आणि संदिग्धतेचा त्या वेध घेऊ पाहतात' [4] नीरजा यांना स्त्रीपुरुष संबंधाचा तिरस्कार नाही. त्याकडे त्या शरीरधर्म म्हणून पाहतात. पतीपत्नीतील ताणतणावाचे नाते त्या अत्यंत संयतपणे उलगडतात. याच प्रवाहातल्या दुसऱ्या स्त्रीलेखिका म्हणजे सिसिलिया कार्व्हालो. त्या कवयित्री म्हणून परिचित आहेत. पण कथेच्या प्रांतातही त्यांनी आपली मोहोर उमटवली आहे. 'काठ' आणि 'परीस' हे दोन कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कथेने मराठी कथात्म साहित्याला एक नवे वळण परिचित करून दिले. कार्व्हालो यांच्या नायिका त्यांना बाहेर फिरताना, प्रवास करताना भेटतात. त्यांच्या सगळ्याच कथा या नायिकाप्रधान नाहीत. त्यांनी निसर्गपर कथा, व्यक्तिचित्रणात्मक कथा, स्त्रीदुःखाची कथा अशा वेगवेगळ्या वळणांनी जाणाऱ्या कथा लिहिल्या. कार्व्हालो यांनी आपल्या कथेसाठी निवडलेले हे आशयद्रव्यावरून त्यांची वास्तवाशी असणारी सामाजिक बांधीलकी दृष्टीस पडते. ललिता गादगे या ग्रामीण कथालेखिका म्हणून उदयास आल्या. स्त्रीच्या वाट्याला येणारे देहभोगाचे दुःख त्या तीव्रतेने मांडतात. स्त्री ही उपभोगाची वस्तू अशी जनमानसात रूढ असलेली समज लेखिका उजागर करतात. अगदी शारीरिक व्यंग असणारी स्त्रीही पुरुषी अत्याचारापासून सुटू शकत नाही, हे वास्तव त्या कटुतेने मांडताना दिसतात. सीमा भारंबे, सुनंदा गोरे याही लेखिकांच्या कथांमधून सामाजिक वास्तव प्रदर्शित होते, जे जागतिकीकरणामुळे अधिकाधिक रूक्ष, भावनाविहीन आणि व्यवहारवादी आहे.

## समारोप :

नव्वदोत्तरी कालखंड हा कथालेखकांना मोठ्या प्रमाणात नवे विषय पुरवता झाला. त्यातून साहित्याला नवझळाळी प्राप्त झाली. लेखक हा समाजाचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्याच्या साहित्यातून निर्माण होणारे जग हे तत्कालीन परिस्थितीची कल्पना यायला पुरेसे ठरते. जागतिकीकरणामुळे समाजाची बदललेली मानसिकता, मूल्ये, प्राधान्यक्रम, दृष्टिकोन लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बाजीराव पाटील यांच्याप्रमाणेच अनेक दलित कथालेखक, स्त्रीवादी लखिका यांच्या कथांच्या अवलोकनातून जागतिकीकरणामुळे बदललेली समाजमूल्ये प्रदर्शित झालेली आहेत.

## निष्कर्ष :

1. नव्वदनंतर स्थानिक राजकारण, जागतिक अर्थव्यवहार, सामाजिक सांस्कृतिक मूल्यसंघर्ष यात संपूर्ण जगभर आमूलाग्र बदल या क्षेत्रातील बदल या क्षेत्रातील अभ्यासकांनी नोंदविले आहेत.

2. अनुभवाचे केंद्र ग्रामीण महानगरी कोणतेही असो, त्या एकूणच जीवनाला प्रभावित करणारी मूल्य संस्कृती एकच आहे आणि ती बाजार मूल्यांची आहे.

3. ग्रामीण कथाकारांच्या दुसऱ्या पिढीत विदर्भाचे उद्धव शेळके, भाऊ मांडवकर, मनोहर तल्हार, वामन इंगळे, बाजीराव पाटील हे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आहेत.

4. नव्वदोत्तर आंबेडकरी वाङ्मयात जी कथा लिहिली गेली, त्यातील मोजकीच कथा अनुभवविश्व आणि एकूणच मराठी कथेच्या विस्तारण्याच्या दृष्टीने समृद्ध आहे.

5. 1975 पासून सुरू झालेला स्त्रीवाद 1990 नंतर अधिकच टोकदार झाला.

6. जागतिकीकरणामुळे समाजाची बदललेली मानसिकता, मूल्ये, प्राधान्यक्रम, दृष्टिकोन लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले.

## संदर्भ :

1. हेरोळे, डॉ. गजानन, संपादकीय, 'नव्वदोत्तर मराठी कथा: रंग आणि अंतरंग' (डॉ. रा.गो.चवरे गौरवग्रंथ) गोदा प्रकाशन, औरंगाबाद, 2018 पृ.10

2. अदवंत म.ना. कथावाङ्मय, 'प्रदक्षिणा' खंड 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ.185

3. जयंतकुमार बंड, 'मराठी कथा वाटा आणि वळणे' , जनसाहित्य परिशद, अमरावती, पहिली आवृत्ती, मार्च 1988, पृ. 97-98

4. जोशी सुधा, पाठराखण, 'जे दर्पणी बिंबले' , मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 2001, पृ. 75

***

Publication Details:
Mandavkar Veera, Navaddottari Marathi Kathetil Navjaniwa, National conference on Adhunik Marathi Sahityatil Badalte Samajik Jeevanmulye Ani Janiwa, by Kavyitri Bahinabai Chaudhari Uttar Maharashtra Vidyapeeth, Jalgaon and Sardar Vallabhabhai Patel Kala Ani Vidnyan Mahavidyalaya, Ainpur, Jalgaon, Dt. 16 Mar. 2022, Published in Journal of Research and Development, Jalgaon, Vol. 13, Issue 13, Apr. 2022, Impact Factor 7.26, pp. 117-121
Available at SSRN: https://ssrn.com/abstract=4288689